सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,
नविन मध्यवर्ती इमारत,दुसरा मजला,पुणे-४११ ००१
दुरध्वनी क्र.:२६१२२८४६/४७ Email - commcoop२०११ @ gmail.com
जा.क्र.४-सआ/कायदा/लवादनामतालिका१९-२२/२०१८/ 876 दिनांक: २६/१०/२०१८

**तात्काळ कार्यवाही**

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था,(प्रशासन सर्व)

**विषय :- बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 चे कलम 84 (4) अन्वये सन 2019-2022 या कालावधीसाठी लवाद नामतालिका बाबत...**

केंद्रशासनाची अधिसूचना दिनांक 24/02/2003 अन्वये लवाद नियुक्तीबाबतचे अधिकार हे संबंधीत राज्याच्या निबंधकांना प्रदान करण्यात आलेले आहेत. सदर अधिसूचनेमध्ये लवाद म्हणून नियुक्तीसाठीची पात्रता विहीत करण्यात आलेली आहे. लवाद नियुक्ती करीता अर्हता व अनुभव हे केंद्र शासनाने निश्चित केलेनुसार खालीलप्रमाणे आहे-

i. सर्व न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी
ii. प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस्
iii. चार्टर्ड अकौन्टंट,कॉस्ट अकौन्टंट
iv. राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे)
v. सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे)

तसेच अशा व्यक्तींची नियुक्ती करताना उक्त अधिनियमामध्ये नमूद नसले तरीही खालीलप्रमाणे जादा अर्हता/पात्रता असाव्यात-

i. त्यांचेवर कोणत्याही स्वरूपाचे गुन्हे दाखल नसावेत.
ii. शासकीय / बँक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा.
iii. अशी व्यक्ती कोणत्याही काळ्या यादीत (Black List) मध्ये समाविष्ट नसावी.

ब) लवाद तालीका तयार करणेची बाब राज्य निबंधकाच्या अखत्यारीतील असल्यामुळे लवाद नामतलीका तयार करण्याचा कार्यक्रम व त्यानुसार ऑफलाईन पद्धतीने विभाग स्तरावर अर्ज मागणी व स्विकृती आणि छाननी संबंधीत विभागीय सहनिबंधक यांचे स्तरावर करावयाची आहे. विभागांकडील तालीका संयुक्त व राज्य स्तराची प्रारुप व अंतिम तालीका मुख्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात येईल.

सन 2019-2022 (01/04/2019 ते 31/03/2019 )या कालावधीची लवाद नामतालिका तयार करणेसाठी संबंधीत विभागांनी त्यांचे स्तरावरून लोकप्रिय वृत्तपत्रांमधून व्यापक जाहिरात / प्रसिद्धी करावयाची आहे. त्यासाठीचा नियोजित कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील-

## लवाद नामतालीका तयार करणेबाबतचे नियोजित वेळापत्रक

| अ.क्र. | नामतालिका तयार करणेबाबतचे मुद्दे | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहिरात प्रसिध्द करणे | 01/11/2018 |
| 2 | अर्ज सादर करणेची अंतीम मुदत | 01/11/2018 ते 30/11/2018 |
| 3 | अर्जांची छाननी | 01/12/2018 ते 31/12/2018 |
| 4 | प्रारूप नामतालीका प्रसिध्द करणे | 15/01/2019 |
| 5 | प्रारुप नामतालिकेवर हरकती मागविणेचा अंतिम दिनांक | 15/01/2019 ते 31/01/2019 |
| 6 | प्राप्त हरकतींवर निर्णय घेण्याचा अंतिम दिनांक | 18/02/2019 |
| 7 | अंतीम लवादतालिका प्रसिध्द करणे | 28/02/2019 |

प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या जाहिरातीचे कात्रण मुख्यालयास सादर करण्यात यावे. संबंधीत विभागांनी त्यांचेकडील प्राप्त सर्व अर्जांची छाननी दिनांक 31/12/2018 पर्यंत करावयाची असून विभाग निहाय लवाद नामतालिका Soft Copy व Hard Copy च्या स्वरूपात दिनांक 05/01/2019 पर्यंत अर्जदारांचे मूळ अर्जांसह मुख्यालयास सादर करावयाच्या आहेत. सदर प्रकरणी एकत्रित प्रारूप व अंतिम यादी मुख्यालय स्तरावरून प्रसिद्ध करण्यात येईल व प्रसिद्धीसाठी सर्व विभागीय सहनिबंधक कार्यालयांना पाठविण्यात येईल.

**स्थळप्रतीवर मा.सहकार आयुक्त यांची स्वाक्षरी असे.**

सोबत : जाहीर निवेदन व अर्जाचा नमुना

( डॉ.किशोर तोष्णिवाल )
अपर आयुक्त व विशेष निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

# जाहीर निवेदन

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था ------------------------यांचे कडून कळविण्यात येते की, बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ चे कलम 84 (4) अन्वये सन 2019-2022 या कालावधीसाठी लवाद नामतालिका (Arbitrators Panel) तयार करणेसाठी खालील व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

i. सर्व न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी
ii. प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस्
iii. चार्टर्ड अकौन्टंट,कॉस्ट अकौन्टंट
iv. राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे)
v. सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे)

**तसेच अशा व्यक्तींची नियुक्ती करताना उक्त अधिनियमामध्ये नमूद नसले तरीही खालीलप्रमाणे जादा अर्हता/पात्रता असाव्यात-**

i. त्यांचेवर कोणत्याही स्वरूपाचे गुन्हे दाखल नसावेत.
ii. शासकीय / बँक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा.
iii. अशी व्यक्ती कोणत्याही काळ्या यादीत (Black List) मध्ये समाविष्ट नसावी.
iv. सदर व्यक्ती संबंधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या जिल्ह्यातील रहिवासी असावी.
v. सदर व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करू शकते.

अर्जाचे विहीत नमुने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था...............व पत्ता................... यांचे कार्यालयात दिनांक ०१/११/२०१८ ते ३०/११/२०१८ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील.अर्ज सादर करणेची अंतीम मुदत दिनांक ३०/११/२०१८ पर्यंत राहील. प्राप्त अर्जाची छाननी पूर्ण करुन दिनांक १५/०१/२०१९ रोजी प्रारूप लवाद नामतालीका प्रसिध्द होईल. सदर प्रारूप नामतालिका यादी संबंधीत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयात लावण्यात येईल. प्रारुप नामीकेवर हरकती असल्यास drcslaw@gmail.com या ई-मेल वर पुराव्यासह हरकती दिनांक ३१/०१/२०१९ पर्यंत सादर कराव्यात. हरकतीचा निर्णय करुन दिनांक २८/०२/२०१९ रोजी अंतीम लवाद नामतालीका प्रसिध्द करण्यात येईल. याबाबतची जाहीर सूचना उपरोक्त नमूद कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सही/-
विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था------

## बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 चे कलम 84 (4) अन्वये सन 2019-2022 या कालावधीसाठी लवाद नामतालिकेवर (Arbitrator's Panel) समावेश होण्यासाठीचा अर्ज.

---

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, ................विभाग

**विषय :- बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 चे कलम 84 अंतर्गत सन 2019-2022 या कालावधीच्या लवाद नामतालिकेवर नावाचा समावेश होणेबाबत...**

संदर्भ :- दै. ............................ मधील दिनांक ........................ रोजीची जाहिरात.

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 चे कलम 84 अंतर्गत सन 2019-2022 या कालावधीच्या लवाद नामतालिकेवर माझा समावेश होणेकरीता माझी वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे :-

1) अर्जदाराचे नाव :- ---------------------------------------------------------------------
(आडनाव) (नाव) (वडीलांचे / पतीचे नाव)

2) कायम पत्ता : ---------------------------------------------------------------------
संपर्कासाठी पत्ता (कायम पत्यापेक्षा वेगळा असेल तर)--------------------------------------

3) जन्म तारीख :- ---------------------------------------------------------------------

4) शैक्षणिक पात्रता:- ---------------------------------------------------------------------

5) दूरध्वनी क्रमांक :--------------------- } पैकी एक क्रमांक देणे आवश्यक .
6) भ्रमणध्वनी क्रमांक :- --------------- }

7) ई मेल आयडी :--(देणे आवश्यक )------------------------------------------------------

8) आधार क्रमांक :...............................................................................

9) अर्जदार हा:-

**अ) सेवानिवृत्त अधिकारी असल्यास** :- (सर्व न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश व सेवानिवृत्त विधी अधिकारी,सहकार विभागातील सेवानिवृत्त उपनिबंधक दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेले अधिकारी, राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील अधिकारी दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी असल्यास)

i) नियत वयोमानान्वये / ऐच्छिक सेवानिवृत्तीचा दिनांक :--------------------------------------

ii) निवृत्ती वेळी धारण केलेले पद व कार्यालय :------------------------------------------------

iii) सेवानिवृत्ती आदेश जावक क्र.व दिनांक:----------------------------------------------------

**ब) प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस् असल्यास :-**

i) शैक्षणिक अर्हता:- ----------------------------------------------------------------------------

ii) (सनद) बार कौन्सील येथे नोंदणीचा क्रमांक व दिनांक :- -----------------------------------

**क) सनदी लेखापाल / ICWA असल्यास**

i) शैक्षणिक अर्हता:- ----------------------------------------------------------------------------

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :-**

i) शैक्षणिक अर्हता : पदवी प्रमाणपत्र

ii) व्यावसायीक अर्हता : एल.एल.बी/एल.एल.एम./सी.ए./आय.सी.डब्लयू.ए. सनद प्रमाणपत्र.

ii) रहिवासाचा पुरावा ( टेलिफोन बील/लाईट बील/प्रॉपर्टी टॅक्स/मतदान कार्ड इ.)

iii) सेवानिवृत्तीचा आदेश

iv) सनद (बार कौन्सील), चाटर्ड अकौंन्टंट, कॉस्ट अकौंन्टंट यांचे सक्षम प्राधिका-याकडील नोंदणीचे प्रमाणपत्राची प्रत)

v) सर्व माहीती व विवरण सत्य व अचुक असल्याचे खालीलप्रमाणे प्रतिज्ञापन-

## स्वयंघोषीत प्रतिज्ञापन

मी.-------------------------- व्यावसायीक वकील / सनदी लेखापाल / ICWA/ न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायाधीश/सेवानिवृत्त विधी अधिकारी/सहकार विभागातील सेवानिवृत्त उपनिबंधक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले अधिकारी/ राष्ट्रीयकृत बँका/ ग्रामीण बँका/भूविकास बँका/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका/ व्यापारी बँका/ नागरी सहकारी बँका/ राज्य सहकारी बँक यांचे सेवेतील अधिकारी दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी प्रतिज्ञापन लिहुन देतो की,

1. माझ्यावर कोणत्याही स्वरूपाचे गुन्हे दाखल नाहीत.
2 मी शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी असुन माझी कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नाही तसेच सेवेत माझ्यावर कोणताही ठपका ठेवलेला नाही. (लागू असल्यास)
3. मी शारीरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम आहे.
4. माझा सहकार खात्याने / इतर कोणत्याही प्राधिकरणाने काळ्या यादी मध्ये (Black List) समावेश केलेला नाही.
5. मी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी आहे.
6. मी ज्या संस्थेचे लवाद म्हणून काम करेल, त्या संस्थेशी माझे हितसंबंध नाहीत.

वरील लवाद नामतालिकेसाठी स्वयंघोषीत प्रतिज्ञापनातील 1 ते 6 मुद्दे हे सत्य असुन त्यामध्ये काही खोटे अढळल्यास होणा-या परिणामास व कारवाईस मी (खाली सही करणार) पात्र राहील.

स्थळ :---------------------

दिनांक :--------------------

अर्जदाराची स्वाक्षरी :- -------------

नांव :----------------

(अर्जासोबत अर्हतेमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वसाक्षांकीत (Self attested प्रती जोडण्यात याव्यात)

* * *